सर्वोत्तम संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,

गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक-422222

Ph. :0253-2230580, 2231715 http://ycmou.ac.in , http://ycmou.digitaluniversity.ac

E-mail : nondani@ycmou.digitaluniversity.ac

विद्यार्थी सेवा विभाग - नोंदणी कक्ष

दिनांक : 20 जानेवारी 2026

शैक्षणिक सत्र जानेवारी - 2026 करिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

१) विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया ही ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. प्रथमतः आपण https://ycmou.digitaluniversity.ac विद्यापीठ संकेतस्थळावर भेट द्यावी.

२) आपणास ज्या शिक्षणक्रमाला प्रवेश घ्यावयाचा आहे. त्यासाठी विद्यापीठाच्या होमपेजवर जाऊन Admission या टॅबवर **Prospectus (माहितीपुस्तिका) जानेवारी 2026** या ठिकाणी विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका उपलब्ध आहेत. माहितीपुस्तिकेतील प्रवेशाशी संबंधित माहिती उदा. प्रवेश पात्रता, शुल्क, अभ्यासक्रम (विषय) , इत्यादी बाबतची माहिती वाचून प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या पानांची प्रिंट काढून घ्यावी.

३) विद्यापीठाच्या संकेतस्थळाच्या होमपेजवर **LSC** या टॅबखाली आपणास शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्रांची यादी उपलब्ध आहे. आपणास जवळचे किंवा सोयीस्कर असलेल्या ज्या अभ्यासकेंद्रावर प्रवेश घ्यावयाचा आहे. त्या अभ्यासकेंद्राचा पत्ता व संकेतांक लिहून ठेवावा.

४) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC) सूचनेनुसार विद्यार्थ्याने **ABC ID** आणि नंतर **DEB ID** तयार करणे अनिवार्य आहे. प्रवेश घेताना विद्यार्थ्याने **ABC ID** आणि **DEB ID** त्याच्या प्रवेश अर्जात नमूद करावा.

५) माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे विद्यार्थ्याने प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असणारा स्वतःचा फोटो स्वतंत्रपणे सॉफ्ट कॉपी **JPG/JPEG/PNG** या **format 5 KB** ते **1024 KB** आणि स्वाक्षरी सॉफ्ट कॉपी **JPG/JPEG/PNG** या **format 5 KB** ते **512 KB** पर्यंत आणि शैक्षणिक पात्रतेची मूळकागदपत्रे **JPG/JPEG/PNG** या **format 50 KB** ते **1024 KB** पर्यंत पूर्णतः सुस्पष्टपणे कलर स्कॅन करून सोबत ठेवावे.

६) ऑनलाईन प्रवेश करण्यापूर्वी संकेतस्थळावरील होमपेजवर ***Presentations*** या टॅबखाली ***User Guide Presentation*** मध्ये ***Students→ Online Admission*** मध्ये दिलेला डेमोतील माहितीनुसार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा.

७) नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश करतांना प्रथम त्यांचा आयडी आणि पासवर्ड तयार करणे आवश्यक आहे. त्यानंतर सर्व तपशीलांसह ऑनलाईन अर्ज सादर करू शकतात. विद्यार्थ्यास प्रथमतः **OTP** मिळतो. सदरचा **OTP** नोंदणीकृत मोबाईल आणि ई-मेलवर येतो. त्यानुसार पुढील माहिती भरून प्रवेश करता येईल.

८) जे विद्यार्थी विद्यापीठाचे पूर्वीचे (जानेवारी 2025 सत्राचे) विद्यार्थी आहेत व ज्यांना 16 अंकी कायम नोंदणी क्रमांक मिळालेला आहे. त्यांचा **USER ID** हा कायम नोंदणी क्रमांक असेल आणि **Password** हा मागील वर्षी वापरल्या नुसार असेल. **Password** आठवत नसेल तर **Forgot Username/Password** क्लिक करून त्यात विचारलेली योग्य ती माहिती भरून विद्यार्थ्यास नवीन **Password** मिळू शकतो. तुमचा मोबाईल नंबर आणि यापूर्वी प्रवेश घेतांना नोंदवलेला मोबाईल नंबर वेगळा असेल तर नवीन **Password** मिळाल्यानंतरच पुढील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येईल.

९) ऑनलाईन प्रवेश करते वेळी प्रवेशाकरिता विचारलेली माहिती काळजीपूर्वक वाचून विद्यार्थ्याने अचूक माहिती भरावी. प्रवेश पात्रतेची आवश्यक ती मुळ कागदपत्रे, फोटो व स्वाक्षरी इत्यादी वरील मुद्दा क्र. 4 प्रमाणे सुस्पष्टपणे कलर स्कॅन करून काळजीपूर्वक पात्रतेसंबंधित कागदपत्रे अपलोड करावीत. अर्धवट, अपूर्ण, चूकीची, अथवा अस्पष्ट (blur) असलेली अशी कागदपत्रे टाकू नयेत. त्यामुळे विद्यार्थ्याची प्रवेश पात्रता तपासतांना प्रवेश नाकारण्यात जाऊ शकतो.

१०) आपण प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे भरणे अनिवार्य आहे. विद्यापीठ हिस्सा व अभ्यासकेंद्र हिस्सा हा एकाचवेळी भरावयाचे असल्याने शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जात दिलेल्या लिंकवरून सदरचे ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/डेबिट कार्ड / नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचा आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्याची राहील.

११) प्रवेशाबाबतचा मेल / एस.एम.एस. आपल्या मेल आय.डी / मोबाईलवर पाठविण्यात येतो. त्यामुळे विद्यार्थ्याने आपणास आलेला E-mail/ SMS वर कायम लक्ष ठेवावे व जतन करून ठेवावे.

१२) विद्यार्थ्यास प्रवेशास पात्र किंवा अपात्र झाला ह्याबद्दल विद्यार्थी आपला UserID व Password वापरून प्रवेशाचे Status पाहू शकतात. विद्यार्थ्यास आपला अर्ज अपात्र असल्यास Reject आणि पात्र असल्यास Approved असा शेरा दिसेल त्यामुळे विद्यार्थ्याने हे सतत अर्जाबाबतची माहिती तपासत राहणे ही विद्यार्थ्याची जबाबदारी असेल. विद्यार्थ्यास विद्यापीठाकडून याबाबतचा स्वतंत्रपणे कोणताही मेल/ मेसेज पाठविला जात नाही. प्रवेश चुकीचा अथवा अपात्र झाल्यास विद्यापीठ नियमानुसार शुल्क परतावा मिळणार नाही.

१३) ऑनलाईन प्रवेश अर्जातील माहिती ही यशस्वीरित्या पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यास बदलता येणार नाही. विद्यार्थ्यास विद्यापीठातर्फे विविध प्रकारचे एस.एम.एस. पाठविण्यात येणार असल्याने मोबाईल क्रमांक एकच ठेवावा वारंवार त्यात बदल करू नये.

१४) आपला प्रवेश कायम होण्यासाठी ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट काढून अभ्यासकेंद्रावर सदरच्या अर्जाची प्रिंट जमा करून आपण आपले अध्ययन साहित्य घ्यावे.

१५) महाराष्ट्र शासनाने मंजुर केलेल्या राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृतीबाबतचे स्वतंत्रपणे सूचनापत्र https://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर Admission या टॅबवर `शिष्यवृत्ती पर्याय स्वीकारून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्यासाठी नियमावली - शैक्षणिक सत्र जानेवारी 2026'
या ठिकाणी दिलेले असून त्याचे काळजीपूर्वक वाचन करूनच आपल्या ऑनलाईन प्रवेशाची आणि शिष्यवृत्ती ऑनलाईन अर्जाची समाजकल्याण विभागाच्या संकेतस्थळावरून कार्यवाही वेळेत पूर्ण करावयाची आहे.

१६) विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार दृष्टीबाधीत (Visual Impaired), बंदी बांधव आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य, इत्यादींना प्रवेश शुल्कात संपूर्णपणे सूट देण्यात आलेली आहे. दृष्टीबाधीत (Visual Impaired), आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य, इत्यादी अर्जदारांनी पूर्णपणे भरलेला ऑनलाईन प्रवेश अर्ज आणि बंदी बांधवांचे विहित नमुन्यातील पूर्णपणे भरलेले प्रवेश अर्ज निवड केलेल्या अभ्यासकेंद्रावर संबंधित कागदपत्रांसह विद्यापीठाने दिलेल्या विहित मुदती पूर्वी जमा करणे बंधनकारक असेल. अभ्यासकेंद्रामार्फत सदरचे प्रवेश अर्ज तात्काळ विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत. विद्यापीठ पातळीवर सदरचे प्रवेश कायम करण्यात येतील.

१७) प्रवेशासंबंधित काही अडचणी आल्यास आपल्या नोंदणीकृत अभ्यासकेंद्राशी/ विद्यापीठाच्या संबंधित विभागीय केंद्राशी/ नोंदणी कक्षाशी संपर्क करावा. तसेच nondani@ycmou.digitaluniversity.ac ह्या मेलवर आपली अडचण कळवू शकता.

.	प्रवर्ग	नवीन प्रवेशाकरिता	कायम नोंदणी क्रमांक असलेल्या विद्यार्थ्यांसाठी
1	दृष्टीबाधित (Visual Impaired,	सिव्हील सर्जनचा अंधत्वाचा दाखला/ शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शिक्षणक्रमाचे शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे आणि प्रवेश अर्ज	16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असल्याचे कागदपत्रे आणि सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रवेश अर्ज
2	आत्महत्या	आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्यांकरिता	16 अंकी कायम नोंदणी क्रमांक

	केलेल्या शेतकऱ्यांचे पाल्य	पित्याची आत्महत्या झाल्याचा तहसीलदाराचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शिक्षणक्रमाचे शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे आणि प्रवेश अर्ज	असल्याचे कागदपत्रे आणि सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रवेश अर्ज
3	बंदी बांधव,	शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शिक्षणक्रमाचे शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, संबंधित अभ्यासकेंद्राचे शिफारसपत्र आणि प्रवेश अर्ज	16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असल्याचे कागदपत्रे आणि सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रवेश अर्ज
4	तृतीय पंथी	शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शिक्षणक्रमाचे शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे, तृतीय पंथी असल्याचे प्रमाणपत्र आणि प्रवेश अर्ज	16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असल्याचे कागदपत्रे आणि सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रवेश अर्ज
5	नक्षलग्रस्त भागातील विद्यार्थी, आर्मी (Army) विद्यार्थी	शाळा सोडल्याचा दाखला, संबंधित शिक्षणक्रमाचे शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे आणि प्रवेश अर्ज	16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असल्याचे कागदपत्रे आणि सर्व संबंधित कागदपत्रांसह प्रवेश अर्ज

१८) विद्यार्थ्यांचे ओळखपत्र ऑनलाईन तयार केले जाईल. अभ्यासकेंद्र /विद्यार्थ्यांनी डाउनलोड करून प्रिंट करू शकतात.

१९) विद्यार्थ्याने स्वतःचा प्रवेश अर्ज स्वतः भरावा. मित्र/ नातेवाईक/ सायबर कॅफे यांच्यावर प्रवेश अर्ज भरण्याची संपूर्ण जबाबदारी सोपवू नये. चुकीची माहिती भरलेला प्रवेश अर्ज अभ्यासकेंद्र/ विभागीय केंद्राकडून अथवा विद्यापीठाकडून नाकारला जाऊ शकतो. त्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक/ आर्थिक नुकसान होण्याची शक्यता असेल.

२०) प्रवेशासंबंधीचे सर्व नियम, अटी व शर्ती तसेच आपण हमीपत्राद्वारे दिलेली माहिती आणि जानेवारी - 2026 या तुकडीच्या माहितीपुस्तिकेतील नियमांचे पालन करणे विद्यार्थ्यास बंधनकारक असेल.

२१) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांना आता मुक्त विद्यापीठातून एकाच वेळी दोन पदवी शिक्षणक्रमांस प्रवेश घेण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या संधीचा लाभ घेऊन आपणांस एकाच वेळी दोन पदवी शिक्षणक्रमांना प्रवेश घेता येईल.

सहायक कक्ष अधिकारी
नोंदणी कक्ष

मार्फत – मा. संचालक विद्यार्थी सेवा विभाग